| Date | Publication | Headline | Edition |
|---|---|---|---|
| May 7, 2015 | Sakal | Only 15% of India's GDP dedicated towards retirement planning | Mumbai |



# निवृत्तीनंतरची मालमत्ता केवळ १५ टक्के

## रिलायन्स कॅपिटल अॅसेट मॅनेजमेंटने केले सर्वेक्षण

**सकाळ न्यूज नेटवर्क**

मुंबई, ता. ६ : देशातील नागरिकांची निवृत्तीनंतरची दरडोई मत्ता (रिटायरमेंट अॅसेट्स) जीडीपीच्या १५ टक्के आहे. ही मत्ता निवृत्तीनंतरच्या जीवनशैलीसाठी पूरक आहे किंवा नाही याचे निदर्शक आहे. भारतीयांची जीडीपीच्या केवळ १५ टक्के निवृत्ती मत्ता ही जगभरातील देशांमध्ये सर्वात कमी असल्याचा निष्कर्ष रिलायन्स कॅपिटलने काढला आहे. या कंपनीने नुकताच रिटायरमेंट सर्व्हे केला, ज्यातून हा निष्कर्ष निघाला आहे.

रिलायन्स कॅपिटलने हे सर्वेक्षण करताना आयएमआरबी इंटरनॅशनल या संशोधन संस्थेचे सहकार्य घेतले आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी अनेक जण तिशीतील आहेत; तर १० कोटी नागरिकांपेक्षा अधिक नागरिक ६० वर्षांवरील आहेत. ज्येष्ठ नागरिकांची ही संख्या २०५० पर्यंत तिप्पट होऊन ३० कोटींवर जाणार आहे. या ज्येष्ठ नागरिकांनी निवृत्तीनंतरच्या आयुष्याचे योग्य नियोजन न केल्यास देशापुढे मोठी आर्थिक समस्या निर्माण होऊ शकेल. या सर्वेक्षणामुळे ग्राहकांचे निवृत्तीनंतरचे नियोजन समजण्यासाठी खूप उपयोग झाल्याचे रिलायन्स कॅपिटलचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी हिमांशु व्यापक यांनी सांगितले.

या सर्वेक्षणानुसार, देशातील लोकांची निवृत्तीनंतरची व पेन्शन मत्ता जीडीपीच्या केवल १५ टक्के आहे. ही टक्केवारी जगात सर्वात कमी आहे. या तुलनेत जर्मनीची निवृत्तीनंतरची व पेन्शन मत्ता जीडीपीच्या २१ टक्के, ब्राझीलची ४१ टक्के, अमेरिकेची ७८.९० टक्के; तर ऑस्ट्रेलियाची १४६ टक्के आहे.